माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

रामाआ- तक्रार क्र. बीएम- २२२/२०२६

तक्रारकर्ता श्री. मुख्तार मामुद शेख

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
श्रीनिवास बगरका ज्युनिअर कॉलेज, जे.बी. नगर,
अंधेरी (पू), मुंबई-५९

प्रथम अपिलीय अधिकारी
श्रीनिवास बगरका ज्युनिअर कॉलेज, जे.बी. नगर,
अंधेरी (पू), मुंबई-५९

तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १२.०८.२०२६

तक्रारकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी	:	अनुपस्थित

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३३०१ प्रकरणी आयोगाने दि.१८.०३.२०२६ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकारी यांनी आयोगास आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत शपथपत्र सादर करावे की, इम्रान शेख या नावाचा विद्यार्थी श्रीनिवास बगरका ज्युनिअर कॉलेज, जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई या विद्यालयात जून- १९८९ ते डिसेंबर- १९९४ या कालावधीत शिक्षण घेत नव्हता व त्या शपथपत्राची एक प्रत अपिलार्थीना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी."

उक्त आदेशाच्या अनुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. २९.०५.२०२६ रोजी तक्रार अर्ज दाखल केला.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

आदेश

सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २५.०८.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

मुंबई
दिनांक : १२.०८.२०२६

State Information Commission ★ सत्यमेव जयते ★ Greater Mumbai

प्रदीप व्यास 12-8-2026
(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

रामाआ तक्रार क्र. बीएम - २२२/२०२६

तक्रारकर्ता श्री. मुख्तार मामूद शेख

सुनावणी दिनांक : २५.०८.२०२६ (In continuation of order dt १२.०८.२०२६)

तक्रारकर्ता	:	उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी	:	अनुपस्थित

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी त्यांचे दि. २५.०८.२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले ते अभिलेखावर घेण्यात आले.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास प्राचार्यांच्या वतीने नोटराईज्ड शपथपत्र सादर केले, संबंधित प्राचार्य, श्रीनिवास बगरका ज्युनिअर कॉलेज नोटराईज्ड शपथपत्र सादर केलेले नाही. म्हणून प्राचार्य, श्रीनिवास बगरका ज्युनिअर कॉलेज यांनी आयोगाने दि. १८.०३.२०२६ रोजीच्या दिलेल्या आदेशाप्रमाणे नोटराईज्ड शपथपत्र जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत पुढील सुनावणीस आयोगास सादर करावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

आदेश

सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०२.०९.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

27-8-2026

मुंबई
दिनांक : २७.०८.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई